प्रकरण चौथे :

# भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर) आणि बहुजन महासंघ यांची राजकीय व्यूहनीती

## प्रकरण चौथे

## भारतीय रिपब्लिकन पक्ष आणि बहुजन महासंघ यांची राजकीय व्यूहनीती

गेल्या पंचवीस तीस वर्षातील दलित समाजाचे राजकारण हे फक्त ऐक्याच्या भावनेवर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नांवाने चाललेले दिसते. बाबासाहेबांच्या निवार्णानंतर निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या आत्मघातक फूटीच्या राजकारणामुळे आणि नेत्यांच्या संधीसाधू वृत्तीमुळे वेळोवेळी दलितांची संघटित शक्ती कमी होत गेली. त्यामुळे दलित समाज बेचैन झाला. प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरूध्द आवाज उठविण्यासाठी व दलितांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी 1972 मध्ये दलित पँथर या संघटनेची स्थापना करण्यात आली. दलित पँथरने अत्यंत आक्रमकपणे दलितांच्या विरूध्दच्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडली. परंतू काही दिवसातच दलित पँथरही विघटित होत गेली. पुढे 1976 मध्ये प्रा.अरूण कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दलित पँथरचे "भारतीय दलित पँथर" असे नामकरण करून पुनरूज्जीवन करण्यात आले.

1976 ते 1986 या काळात दलित चळवळीत दोन महत्त्वाच्या घटना घडल्या पैकी एक दलित पँथरचे पुनरूज्जीवन आणि दुसरी प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली "सम्यक् समाज आंदोलनाची" निर्मिती या होय. नव्या दलित पँथरने "मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर" हा एककलमी कार्यक्रम महाराष्ट्रात राबवून एक वादळ उभे केले. परंतू कोणतीही सामाजिक वा राजकीय चळवळ ही भावनात्मक प्रश्नावर सदासर्वकाळ उभी करता येत नसते. भावनात्मक प्रश्न फक्त चळवळ जिवंत ठेवण्याचे काम करीत असतो. पण चळवळीला भक्कम असा टिकावूपणा भावनात्मक प्रश्न देवू शकत नाही. चळवळ सामाजिक, राजकीय त्याचबरोबर आर्थिक पायावर उभी करावी लागते. पण भावनिक प्रश्नात गुंतल्यामुळे भारतीय दलित पँथरवर पर्यायाने दलित समाजावर काही मर्यादाही

आल्या.

## सम्यक समाज आंदोलन

डॉ. बाबासाहेबांच्या निवार्णानंतर दलित समाजाची विस्कटलेली घडी व्यवस्थित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू (भैय्यासाहेब आंबेडकरांचे पुत्र) प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला 1980 नंतर सुरूवात केली. "सम्यक् समाज आंदोलन" या नावाची संघटना उभी करून त्यांनी आपल्या कार्याला सुरूवात केली. सम्यक समाज आंदोलनाच्या निर्मितीपूर्वी त्यांनी दलित समाजातील सर्व नेत्यांना एकत्र करून चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला. त्यादृष्टीने 11-12 डिसेंबर 1982 रोजी पुणे येथे महाराष्ट्रातील विविध संघटनांची व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठकही झाली. या बैठकीत बाळासाहेब आंबेडकर यांनी नामांतरासहित इतरही प्रश्न घेऊन त्यावर चळवळ उभारून नेतृत्व करावे असे ठरले.

प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली "सम्यक समाज आंदोलन" हे नाव संघटनेने घेतले. "सम्यक" याचा अर्थ योग्य मार्गाने जाणारे, विवेकाने विचार करणारे"[1]. भारतीय दलित पँथर पेक्षा सम्यक समाज आंदोलनाने दलितांच्या प्रश्नाकडे वास्तववादी भूमिकेतून पाहिले. दलितांच्या सामाजिक व आर्थिक मागण्या घेऊन जनआंदोलन छेडले. प्रकाश आंबेडकरांसारख्या बाबासाहेबांच्या वंशजाभोवती जनता संघटित होऊ लागली. त्यामुळे या नव्या नेतृत्वाला "मास बेस" प्राप्त झाला. सम्यक समाज आंदोलन या संघटनेच्या वतीने 2 मार्च ते 8 मार्च 1983 नाशिक ते मुंबई असा पायी इशारा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये प्रकाश आंबेडकरांच्या पाठिशी जयदेव गायकवाड, एल.डी.भोसले, मुरलीधर जाधव यांचेसारखे निष्ठावंत, प्रामाणिक व कष्टाळू कार्यकर्ते उभे राहिले. प्रकाश आंबेडकरांचे नेतृत्वामुळे भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दल व संपूर्ण दलित समाजामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. काळाराम मंदीर सत्याग्रह स्मृतिदिनाच्या दिवशी 2 मार्च 1983 रोजी नाशिक येथून निघून 8 मार्च रोजी मुंबईत प्रचंड जनसमुदायासह इशारा मोर्चा आला. या इशारा मोर्चा विषयी अर्जुन डांगळे म्हणतात, "इशारा मोर्च्याने भीमशक्ती संघटित झाली आहे. लाचार, स्वार्थी, सौदेबाजीच्या राजकारणाला दणके बसले

आहेत· शासन व प्रतिगामी संघटना जाळे टाकायला बघत आहेत आता काही झाले तरी माघार नाही हा सम्यक समाज आंदोलनाचा निर्धार आहे· कारण बाबासाहेबांनी जी चळवळ केली, जे तत्वज्ञान सांगितले, ज्या संघटना उभ्या केल्या, त्या जिवंत ठेवण्याचा आणि पुढे नेण्याचा आंदोलनाचा निर्धार आहे· भारतीय बौध्द महासभा जोमाने कार्य करीत आहे· समता, सैनिक दल जिल्हया-जिल्हयातून उफाळून येत असून आकार घेत आहे· परंतू बाबासाहेबांचे राजकीय तत्वज्ञान सांगणारा त्यांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष मात्र छिन्नविछिन्न आणि गलितमात्र अशा अवस्थेत आहे· स्वार्थी, अहंकारी आणि चळवळीचे भान नसलेल्या प्रवृत्तींनी हा पक्ष वाटून घेतला आणि स्वतःचे मठ स्थापन केले· बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पक्षाची घडी व्यवस्थित करून, ती एकसंध करून, त्याला अधिक गतिशील करून बाबासाहेबांचे तत्वज्ञान तळागाळापर्यंत पोहोचवून, तिथल्या माणसांची अस्मिता जागृत करून, एक विराट आणि निर्णायक आंदोलन छेडण्याचा आंदोलकांचा निर्धार आहे· सम्यक समाज आंदोलन हे भविष्यात होणा-या रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीची नांदी आहे·"[2] अशा प्रकारे सम्यक समाज आंदोलनाने नंतरच्या काळात नवा रिपब्लिकन पक्ष स्थापन करून जुन्या रिपब्लिकन पक्षांच्या गटांच्या स्पर्धेत विजयी होण्यासाठी आपले कार्य सुरू केले· प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांसारखे नीतिमान, चारित्र्यसंपन्न व गतिमान तसेच व्यापक भूमिका घेणारे नेतृत्व पुन्हा एकदा दलित समाजाला मिळाले· सम्यक समाज आंदोलनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दलित समाजाला व दलित चळवळीला एक नवे तेज निर्माण करून देण्याचा प्रयत्न प्रकाश आंबेडकरांनी केला· सर्व दलितांना एकत्रित करून त्यांच्या संघटित शक्तीला राजकीय सत्ता प्राप्त करून देण्याचाही त्यांनी प्रयत्न केला·

## भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना

प्रकाश आंबेडकरांनी सम्यक समाज आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या सार्वजनिक जीवनाला सुरूवात केली· दलितांच्या चळवळीला एक वास्तववादी दिशा देण्याचे काम सम्यक समाज आंदोलनाने केले· प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 1983 मध्ये काढलेला मोर्चा नाशिक ते मुंबई असा पायी इशारा मोर्चा हा दलितांच्या जागृती बरोबरच नामांतर,

भूमिहिनांना जमिनी देणे इ.मागण्यांसाठी होता. म्हणजेच फक्त दलितांची चळवळ भावनात्मक प्रश्नावर उभी न ठेवता त्यांनी वास्तववादी दृष्टिने दलितांच्या मुक्तीचा विचार केलेला दिसतो. पुढे या सम्यक समाज आंदोलनाचे रूपांतर रिपब्लिकन पक्ष स्थापनेमध्ये झाले.

"प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या पुनर्बांधणीची घोषणा 27 नोव्हेंबर 1983 रोजी मुंबईत विविध गटांच्या व संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात करण्यात आली."[3] आणि पुनश्चः आंबेडकरी जनतेमध्ये नवा जोम निर्माण झाला. प्रकाश आंबेडकरांच्या रूपाने एक चांगले नेतृत्व दलित समाजाला मिळाले. "आंबेडकरी चळवळीच्या विकासातील एक तिसरा टप्पा म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या घोषणेकडे पाहता येईल."[4]

रिपब्लिकन पक्षाच्या घोषणेनंतर दि.5 आणि 6 मे 1984 रोजी पुणे येथे भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन घेतले गेले. या अधिवेशनामध्ये 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील एक लढाऊ, स्वाभिमानी बाण्याचा पर्यायी पक्ष उभा करावयाचा पुनर्बांधणीच्या वेळी सांगोपांग विचार करण्यात आला. त्याचबरोबर हा पक्ष फक्त एक जातीयच न ठेवता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारा सर्व जाती-धर्मातील समविचारी लोक सामावून घेणारा रिपब्लिकन पक्ष उभा करण्याचे ठरविण्यात आले. भारतीय संसदीय राजकारणाचा विचार करता एकजातीय पक्ष टिकाव धरू शकत नाही. म्हणून सर्व शोषितांना बरोबर घेण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची निर्मिती करण्यात आली.' या पुनर्रचित रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपद मातोश्री गीताबाई गायकवाड तथा जीजी यांचेकडे दिले गेले. तर महाराष्ट्र राज्याच्या जनरल सेक्रेटरी म्हणून डॉ.नीलम गो-हे या ब्राह्मण समाजाच्या कार्यकर्तीची निवड केली गेली. यावरून हा पक्ष सर्व जाती-जमातीला बरोबर घेऊन जाणारा असल्याचे दिसते.

रिपब्लिकन पक्षाची पुनर्बांधणी कशासाठी ? या लेखात अर्जुन डांगळे लिहितात, "भावानात्मक, जातीय किंवा धार्मिक व्देषावर आधारित अशा प्रश्नावर उग्र चळवळी करणे किंवा तो पक्षाचा कार्यक्रम करणे हे या पुनर्रचित पक्षाला नामंजूर आहे. समग्र दलित शोषितांच्या जीवन मरणाच्या प्रश्नांना केंद्रबिंदू मानून चळवळी करणे आणि लोकशाही

समाजवादाच्या दिशेने वाटचाल करणे हे या पक्षाला अभिप्रेत आहे. "जमिनीचे राष्ट्रीयकरण" करावे यासाठी पुणे अधिवेशनात महाराष्ट्रव्यापी जेल भरो सत्याग्रह करण्याचा ठराव करण्यात आला आहे."[5] अशाप्रकारे एका मोठया जिद्दीने प्रामाणिकपणे दलित शोषितांच्या मूलभूत प्रश्नावर लढा देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाची पुनर्बांधणी करण्यासाठी प्रकाश आंबेडकर आणि त्यांचे सहकारी उभे राहिले.

## भारिपची विचारसरणी

1984 मध्ये पुणे येथील अधिवेशनामध्ये भारिपची भूमिका काय असावी याविषयी चर्चा करण्यात आली. आजपर्यंतची दलित मुक्तीची चळवळ ही फक्त भावनेवर आधारित होती. परंतु भारिपच्या स्थापनेनंतर दलित चळवळीला एक नवी दिशा व वास्तववादी दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न केला गेला.या पक्षाला महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या अत्यंत समृध्द अशा विचारांचा वारसा आहे. हा पक्ष दुर्लक्षित आणि सामाजिक, आर्थिक फायद्यांना वंचित असणा-या समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. सामाजिक आणि आर्थिक विषमतेवर आधारित असलेली अन्यायी समाजरचना बदलण्याची बांधिलकी या पक्षाने स्वीकारलेली आहे. कॉंग्रेस पक्षाशी कुठल्याही प्रकारचा संबंध न ठेवता या पक्षाने आपली स्वतंत्र अशी विचारसरणी मांडलेली आहे. 1984 च्या पुणे अधिवेशनामध्ये काही महत्त्वपूर्ण ठराव मांडले. या ठरावावरून पक्षाची विचारसरणी स्पष्ट होते.

## "भारतीय रिपब्लिकन पक्ष अधिवेशन" 1984 ठराव

### ठराव क्र. 1 : रिपब्लिकन पक्षाची पुनर्बांधणी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा खराखुरा रिपब्लिकन पक्ष उभारण्याचा आम्ही निर्धार करीत आहोत. या देशातील राजकारणावर सरंजामदार व श्रीमंतांची घट्ट पकड आहे व मतांचे सौदे करून लोकशाहीचा डोलारा उभारण्याचा प्रयत्न चालू आहे. दलित श्रमिकांना काहीही राजकीय अस्तित्व नाही. या बहुसंख्याक शोषितांची सत्ता प्रस्थापण्यासाठी आम्ही रिपब्लिकन पक्ष पुनर्बांधणी करीत आहोत. सध्याचे एकजातीय राजकारण ठोकरून आम्ही सर्वसमावेशक वृत्तीने सर्व तळागाळातील समान आर्थिक-दृष्टया दुर्बल समूहांना बरोबर घेऊ. केवळ भाषणाचा भपका न करता विचार व कृतीने

आम्ही समस्त जनतेचे राजकारण करून लवकरच एक मुख्य राजकीय प्रवाह होऊ. तुकडयांचे व लाचारीचे राजकारण न करता पोलादी वृत्तीने संपूर्ण सत्ताच ताब्यात घेण्यासाठी लढू लागू. या देशाचे सर्व राष्ट्रीय प्रश्नांकडे देशहिताचे दृष्टीने पाहू व या देशाचे नेतृत्व करू असा आम्ही निर्धार करतो.

ठराव क्र.2 : राष्ट्रीयीकरण

सध्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर मूठभर धनदांडगे जमीनदार, भांडवलदारांची पकड आहे. एकीकडे मूठभर प्रचंड श्रीमंत होत आहेत तर बहुसंख्यांक दारिद्र्याच्या खाईत लोटले जात आहेत. खेडयात जमीनदार व भूमिहीन दलित शेतमजूरांतील संघर्ष दिवसेंदिवस वाढताहेत. जमीनदारीतून जातीयता ही पोसली जात आहे. खाजगी क्षेत्रात प्रचंड स्वार्थ बोकाळला आहे. शेकडो कारखान्यातील कलहापोटी उत्पादनाला खीळ बसत आहे. कामगारांचे जीवनाशी जुगार खेळला जात आहे. या दोन्ही क्षेत्रातील अमानुष संघर्ष पाहता या संदर्भात जीवन दृष्टिने पाहिले पाहिजे व दलित भूमिहीन, शेतमजूर, कामगार, कष्टक-यांचे शोषण रोखण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादलेली राज्य-समाजवादाची संकल्पना हाच एकमेव तोडगा आहे, असे आम्हास वाटते. जमीन व कारखान्यातील खाजगी मालकी हक्क नष्ट करून त्यावर जनता तथा शासनाची मालकी निर्माण केली तरच ही उद्ध्वस्त होणारी अर्थव्यवस्था रोखली जाईल आणि म्हणूनच आम्ही असा निर्धार करतो की, जमिनीचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी यापुढे रिपब्लिकन पक्ष चळवळ हातात घेईल व येत्या मे च्या 21 तारखेपासून अकोला जिल्हयातून चळवळीला सुरुवात करून ही मागणी देशव्यापी करू. कारखान्यातील कामगारांच्या संघटना करू व शोषणरहित उत्पादन व्यवस्था निर्माण करण्यासाठी यापुढे निर्धाराने लढू उत्पादनातील ऐष आरामी सुखासीन अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाऐवजी समाजाच्या मूलभूत गरजा भागविणारे उत्पादन व अल्प किंमती व योग्य वितरण व्यवस्था यांचा आग्रह धरू.

अर्थव्यवस्थेतील बोकाळलेली लाचलुचपत नष्ट करण्यासाठी जन आंदोलने करू आणि देशातील न्याय तथा समतेवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी कायदे निर्माण करू.

ठराव क्र·3 : निवडणूक पध्दतीतील बदल

भारतामध्ये दरडोई एक मत आणि एक उमेदवार ही पध्दत स्विकारण्यात आलेली आहे· भारतीय समाजरचनेतील दोन घटक जात आणि धर्मसत्ता यांनी निवडणूक पध्दतीसही वेठीस धरले आहे· परिणामी हिंसा, पैसा, भ्रष्टाचार यांनी सर्वसामान्य माणसाला राजकारणातील ख-या निर्णय प्रक्रियेतून वंचित ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न चालविलेला आहे· ही कोंडी फोडण्याच्या दृष्टीने आम्ही सुचवित आहोत की, एक मत एक पक्ष ही पध्दत स्विकारून मतदारांना पक्षाचे पर्याय समोर असावेत· प्रत्येक पक्षाला जितकी टक्के मते मिळतील तितका वाटा सर्व लोकशाही निर्णय संस्था (ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद, विधान सभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा) मध्ये असावा· या पक्षाच्या निवडणूकांच्या खर्चाची जबाबदारी शासनाकडे असावी·

ठराव क्र·4 : स्त्री-पुरुष विषमता

भारतीय समाजव्यवस्था संरजामी भांडवलशाही संयुक्त स्वरूपाची आहे· परंपरागत चातुर्वर्ण्याच्या कल्पनांचा पगडा समाज माणसावर व संपूर्ण व्यवस्थेवर मोठया प्रमाणात आहे· शूद्रातिशूद्रांसाठी असणारे अमानवी समाजनियम आणि स्त्रियांवर लादल्या गेलेल्या रुढी, बंधने, अत्याचार ही जन्माधिष्ठित उच्च-नीचतेच्या नियमानुसार निर्मिलेल्या व्यवस्थेतील शोषणाचीच दोन अंगे आहेत·

समाजातील प्रत्येक मनुष्यमात्रास संपूर्ण विकासाची संधी मिळाली पाहिजे असे आम्ही मानतो· त्यादृष्टीने स्त्री-पुरुष विषमतेच्या परिणामी स्त्रीला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात जे दुय्यम स्थान मिळाले आहे ते बदलत गेले पाहिजे आणि समाजव्यवस्थेतील हे दुय्यम स्थान बदलण्याचे दृष्टीने विशेष प्रयत्न झाले पाहिजेत· प्रत्येक माणसाचे व्यक्तिगत जीवन, कुटुंब, गावे आणि समाजातील सर्व निर्णय प्रक्रियेची आर्थिक, राजकीय, सामाजिक संस्था यात या संदर्भात विशेष जागृती आणि संघर्ष व लोक संघटनांची आवश्यकता आहे असे आम्ही आग्रहपूर्वक नमूद करतो·

दलित, शेतमजूर, कामगार, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराची शासन संस्था विशेष दखल घेत नाहीत याबाबत आम्ही निषेध करतो. स्त्री केवळ उपभोगाची वस्तू मानून तिला माणूस म्हणून जगण्याची संधी न देणा-या पुरुषप्रधान प्रवृत्तीचाही आम्ही निषेध करतो. विशिष्ट स्त्रियांवरील हुंडाशाही, तलाक, देवदासी प्रथा, सती प्रथेच्या पुनरुज्जीवनाचे व उदात्तीकरणाचे प्रयत्न याबाबत तीव्र चिंता व्यक्त करून या विरोधी विशेष प्रबोधन करण्याचा निर्णय घेत आहोत.

ठराव क्र. 5 : मोफत शिक्षण

भारतातील अर्थव्यवस्था हातात केंद्रीत करणारे मांडवलदार, जमीनदार उदारमतवादी विचारांचा बुरखा पांघरून समाजाचा विकास करण्याची आवई उठवत आहेत. या विकासाची फळे, समाजातील बहुसंख्य पिळल्या गेलेल्यांच्या वाटयाला येत नसून त्यांनी ही आर्थिकदृष्टया सक्षम गटांकडे फायदे केंद्रीभूत झाले आहेत. परिणामी प्रत्येक विकासास आवश्यक योजना उदा. आरोग्य शिक्षण अंतिमतः अत्यंत परिणामकारक झाली आहे असे दिसते. चातुवर्ण्य व्यवस्थाच काही प्रमाणात बदलून वेगळे स्वरूप स्विकारते आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रवेशांसाठी देण्याची सक्ती, मोफत वसतिगृहांच्या अल्प सोई, पुस्तके व प्रवासखर्चाचा प्रश्न, ग्रामीण भागातील मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न यामुळे सर्वांना शिक्षणास संधी हे तत्व कागदावरच राहिलेले आहे. महागाई व अल्पवयीन मुलामुलींच्या पिळवणूकी बाबतची कायद्यातील ढिलाई यामुळे शिक्षणातील गळतीचे प्रमाण मोठे आहे. मोठया शहरात स्थलांतरित विविध भाषिक मुलामुलींच्या गैरसोईचा मोठा प्रश्न आहे.

शासनाने आर्थिक नियोजनात सर्वांसाठी वसतिगृह प्रवास खर्चासह मोफत शिक्षणाची सोय अंतर्भूत करावी असा ठराव आम्ही मंजूर करीत आहोत. त्याचप्रमाणे शिक्षण संस्थातील भ्रष्टाचार, खाजगी वसतिगृहातील गैरव्यवहार या संदर्भात आळा घालण्यास कडक उपाय योजना करावी.

ठराव क्र.6 : मंडल आयोग

मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यात जी देशपातळीवर दिरंगाई, मतभेद निर्माण केला जातो आहे याचा रिपब्लिकन पक्ष धिक्कार करतो व आग्रहापूर्वक प्रतिपादन करतो की, मंडल आयोग तातडीने स्विकारून त्यात संदर्भात असलेल्या मागास समाजाच्या विकासांचे वाटचाल सुरू करून न्यायावर आधारलेल्या समाज निर्मितीची प्रक्रिया सुरू करावी.

ठराव क्र.7 : नामांतर व्हावे

नामांतराबाबत शासन व विधिमंडळाने घेतलेली भूमिका विधिसंकेता विरूध्द आहे. नामांतराचा प्रश्न अशाप्रकारे लोंबकळत ठेवणे म्हणजे दलितांच्या दुःखावर डागण्या दिल्याप्रमाणे आहे. तेव्हा नामांतर त्वरीत करून समतेच्या मूलत्वाची बूज राखावी.

ठराव क्र.8 : नवबोध्दांना केन्द्रीय सेवेत राखीव जागा देणेबाबत

केंद्रीय सेवेत बोध्दांना राखीव जागा नाहीत. त्यामुळे केंद्रीय सेवेत भारतीय दलितांना स्थान नाही, ही बाब केन्द्र सरकार हिंदुत्ववादी धोरण अवलंबिते असे होईल. ही तफावत दूर करण्यासाठी केंद्र सरकारने ताबडतोब केंद्रीय सेवेत बोध्दांना राखीव जागा निर्माण कराव्यात.

ठराव क्र.9 : सागर येथे बाबासाहेबांचे स्मारक व्हावे

सागर येथे महार रिजीमेन्टचे कार्यालय आहे. महार रिजीमेन्टने भारतीय संरक्षणात मोठा वाटा उचलला. अशा सागर येथे डॉ.बाबासाहेबांचे सैनिकी शिक्षणासाठी इंडियन मिल्ट्री ॲकॅडमी स्थापन करावी व त्या संस्थेत केवळ दलितांनाच प्रवेश द्यावा."[6]

अशाप्रकारे भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेनंतर या पक्षाला एक तात्विक व सैध्दांतिक बैठक प्राप्त करून दिली. दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये वास्तववादी विचारसरणीवर हा पक्ष उभा करण्यात आला. पुणे येथील अधिवेशनात जे ठराव पास केले त्यावरून असे दिसते की, हा पक्ष दलित, शोषितांच्या, कष्टकरी, कामगार, दलित

स्त्रिया यांच्या मानवी मूलभूत हक्कांसाठी लढा देणारा आहे. नंतरच्या काळात भारिपने जो कार्यक्रम व आपली राजकीय व्यूहनीती आखली ती दलितांच्या सामाजिक समतेबरोबर राजकीय व आर्थिक विकास कसा साकार करता येईल या दृष्टीनेच होती.

## भारिपची रचना

'कोणत्याही राजकीय पक्षाला समाजातील सर्व क्षेत्रातून पाठिंबा मिळवून आपली राजकीय शक्ती वाढवावी लागते. त्यासाठी त्याला विविध आघाडया निर्माण करून कार्य करावे लागते. त्यादृष्टीने भारिपने विविध आघाडया निर्माण करून समाजातील विविध क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. यामध्ये प्रामुख्याने - 1. युवक रिपब्लिकन, 2. रिपब्लिकन महिला आघाडी, 3. भारतीय कामगार संघटना इ. होय.'

युवकांच्या प्रश्नावर लढा देण्यासाठी युवक रिपब्लिकनची स्थापना करण्यात आलेली असून महिलांच्या विविध प्रश्नांवर लढा देण्यासाठी रिपब्लिकन महिला आघाडीची स्थापना केलेली आहे. त्याचबरोबर कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या हिताचा विचार केला जातो. मुंबई महानगर पालिकेमध्ये कामगारांची संघटना असून वैद्यकीय क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी औरंगाबाद मेडिकल लेबर युनियन आहे. त्याचबरोबर शासकीय आणि निमशासकीय क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांना संघटित करण्याचे कार्यही रिपब्लिकन कामगार संघटना करीत आहे.

भारतीय रिपब्लिकन पक्षाची सुव्यवस्थित अशी बांधणी करण्यात आलेली आहे. या पक्षाची राष्ट्रीय पातळीवर कार्यकारिणी असून राज्य व जिल्हा व ग्राम पातळीवरही कार्यकारी मंडळ आहे. कार्यकारिणीमध्ये प्रामुख्याने अध्यक्ष, उपाध्यक्ष, जनरल सेक्रेटरी, खजिनदार, महिला संघटक, कामगार संघटक, युवक संघटक अशी विविध पदे असून राष्ट्रीय पातळीपासून ग्रामपातळीपर्यंतच्या सर्वसामान्य माणसांना समाविष्ट करून घेतलेले आहे.

या पक्षामध्ये अत्यंत अनुभवी व बुध्दीमान असे क्रियाशील कार्यकर्ते आहेत. यामध्ये अर्जुन डांगळे, अविनाश महातेकर, ॲड. जयदेव गायकवाड, प्रा. जे. जी. खैरनार, प्रा. अविनाश डोळस, प्रा. एस. के. जोगदंड, प्रा. एस. के. गायकवाड, डॉ. जाधव, जी. मूर्ती,

SHIVAJI UNI...

अॅड·प्रतापराव ढवे, मुरलीधर जाधव, सुखदेवराव जाधव, प्रा·माधवराव मोरे, अॅड·बी·एच· गायकवाड, एल·डी·भोसले, लंकेश्वरजी, बी·आर·शिरसाट चंदन तेलंग इ·बुध्दीमान व अनुभवी अशा कार्यकर्त्यांची फळी भारिपकडे आहे· डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर पहिल्या टप्प्याच्या कार्यकर्त्यांचा अपवाद वगळता अशा बुध्दीमान आणि अनुभवी लोकांमार्फत भारिपची चळवळ सुरू आहे·

भारिप आपली चळवळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी "प्रबुध्द भारत" हे साप्ताहिक मुंबईतून प्रसिध्द करते· तर "मूकनायक" हे पत्रक अकोला येथून प्रसिध्द करते·

<u>भारिपची कामगिरी/राजकीय व्यूहनीती</u>

1984 मध्ये प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाने आज अखेरपर्यंत दलित मुक्तीचा जास्त व्यापक अर्थाने विचार केला· सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाशी तडजोडीचे राजकारण न करता डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराशी बांधिलकी मानणा-या इतर समविचारी लोकांच्या पक्षाच्या सहकार्याने दलितांचे राजकारण केले· अर्जुन डांगळे यांनी आंबेडकरी चळवळीची वैचारिक भूमिका कोणत्या स्वरूपाची असावी या दृष्टीने पुढील काही सूत्रे सांगितली आहेत·

"1· दलित किंवा आंबेडकरी चळवळ ही फक्त जातीय न राहता ती व्यापक व असावी·

2· ती एक स्वतंत्र, बलाढय राजकीय ताकद म्हणून उभी राहून सत्ता संपादनाच्या दृष्टीने तिने वाटचाल करावी·

3· आंबेडकरी चळवळीने समविचारी पक्ष संघटना यांच्याशी सुसंवाद साधावा·

4· चळवळीची अधिष्ठान हे आक्रस्ताळी किंवा भावनात्मक असता कामा नये· मूलभूत प्रश्नांची तिला जाण असावी·"[7]

या महत्त्वाच्या चार सूत्रांव्दारे भारिपने दलित मुक्ती विचार केलेला दिसतो· भारतीय रिपब्लिकन पक्षाने सर्व दलित, पिडीत, शोषितांना आपल्या पक्षामध्ये सामावून

घेतलेले आहे. केवळ एका जातीची वा जात व धर्म अशी भावनिक चळवळ न ठेवता सर्व जातींना बरोबर घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे बाबासाहेबांना अपेक्षित असणारा खरा रिपब्लिकन पक्ष व्यापक पायावर उभा करण्याचे सर्व श्रेय भारिपला जाते. भारतीय रिपब्लिकन पक्षाने जी कामगिरी केली ती महत्त्वाची आहे. केवळ "राजकारणासाठी राजकारण" करत न बसता "समाजकारणासाठी राजकारण" केलेले आहे. भारिपने निवडणूकीच्या राजकारणात तर आपला प्रभाव दाखवला पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय व्यूहनीतीप्रमाणे संसदीय व्यवस्थेबाहेर राहून दलितांमध्ये जागृती व दबावाचे राजकारण केले. भारिपने 1984 पासून आजपर्यंतजी कामगिरी केली ती पुढीलप्रमाणे -

"1. 22 जुलै 1984 रोजी पुणे येथे झोपडपट्टीवासियांची परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये 35 हजार स्त्रिया व 65 हजार पुरुष असे एक लाख लोकांनी भाग घेतला.

2. 10 ऑगस्ट 1984 रोजी शासनाने राखीव जागा भराव्यात या मागणीसाठी जळगाव येथे निदर्शने केली.

3. 1 ऑगस्ट 1984 रोजी जबरदस्तीने बळकावलेल्या जमिनी ज्याचे त्याला परत मिळाव्यात व पिकांच्या सुरक्षितते संदर्भात यवतमाळ येथे जाहीर सभा घेतली.

4. 7 जानेवारी 1985 रोजी विदर्भातील पक्ष कार्यकर्त्यांचे एक शिबीर वरूड येथे घेण्यात आले.

5. झोपडपट्टीवासियांच्या समस्या सोडविण्यासाठी 5 मे 1985 रोजी मुंबई येथे एक मोठा मोर्चा काढला.

6. "सहकारी साखर कारखान्याचे राष्ट्रीयीकरण आणि दलित शेतक-यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न" या विषयावर 23 जून 1985 रोजी एक चर्चासत्र आयोजित केले.

7. साखर कारखाने शासनाने ताब्यात घ्यावेत या मागणीसाठी माणगाव ते पुणे असा 17 नोव्हेंबर 85 ते 27 नोव्हेंबर 85 लॉंग मार्च काढला. देशातील अत्यंत महत्त्वाचा लढा प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झाला. या लॉंगमार्च मध्ये 50 हजार लोक सहभागी झाले होते.

8· 16 जानेवारी 1986 रोजी गोंदीया येथे बिडी कामगारांची परिषद घेतली·

9· सोलापूर येथे 13 ऑक्टोबर 1986रोजी अनुसूचित जाती-जमाती, भटक्या विमुक्त जाती आणि मातंग समाज यांची परिषद घेतली·

10· 14 नोव्हेंबर 1986 रोजी नांदेड येथे व 17 नोव्हेंबर 1987 मध्ये भुसावळ येथे दुष्काळी परिषद घेतली· अशाच प्रकारची परिषद धामणगाव येथे 8 फेब्रुवारी 1987 ला व भुसावळ येथे 7 मार्च 1987 रोजी घेण्यात आली·

11· 27 नोव्हेंबर 1987 रोजी औरंगाबाद येथे भूमिहिनांच्या हक्क सुरक्षिततेसाठी अधिवेशन घेण्यात आले·

12· 5 फेब्रुवारी 1988 रोजी रिडल्सच्या प्रश्नावर मुंबई येथे विधानभवनावर विराट मोर्चा काढला"[8]

अशाप्रकारे नामांतर, मंडल आयोग या प्रश्नावर तर भारिपने लढे उभारलेच पण त्याचबरोबर जमीन, पाणी, झोपडपट्टी, बेकारी, दुष्काळी भागाचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न यावरही लढे दिले· ही सर्व कामगिरी भारिप करीत असताना समाजातील सर्व दलित व इतर मागासवर्गीयांच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले·

## भारिप राष्ट्रीय अधिवेशन 1988

भारतीय रिपब्लिकन पक्षाने 1984 पासून सतत समाजातील सर्व दलित, पिडीत व इतर मागासवर्गीय यांच्या सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीने कार्य केले व आपली व्यापक भूमिका निश्चित केली·

दि·28-29-30 ऑक्टोबर 1988 रोजी औरंगाबाद येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले· या अधिवेशनाला राज्यातील 20 जिल्हे व मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश इ·ठिकाणाहून जवळ जवळ एक ते दीड लाख प्रतिनिधी उपस्थित राहिले होते· या अधिवेशनाचे उद्घाटन भारिपचे नेते अॅड·प्रकाश आंबेडकर यांनी केले·

आपल्या उद्घाटनपर भाषणात ॲड·प्रकाश आंबेडकर यांनी असे प्रतिपादन केले की, "भारताची अर्थव्यवथा काही मूठभर लोकांच्या हातात असल्यामुळे देशातील गरीब हा गरीबच राहिलेला असून तो मिळणा-या मूलभूत गरजांपासून वंचित राहिलेला आहे· ही अर्थव्यवस्था बदलल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही·"[9]

यावरून असे दिसते की भारिपने देशातील अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी पाऊल उचलले होते·

ओरंगाबाद येथील राष्ट्रीय अधिवेशनात खालील ठराव करण्यात आले

"1· जमीनीचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे·
2· मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी·
3· स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान बदलावे म्हणून रिपब्लिकन महिला आघाडी झुंजार संघर्ष करेल·
4· शासनाने राखीव जागा भराव्यात·
5· सार्वजनिक क्षेत्राची पिछेहाट शासनाने त्वरीत थांबवावी·
6· मंडल आयोगाची त्वरीत अंमलबजावणी करावी·
7· दलित-आदिवासीच्या आर्थिक विकासांच्या योजना राबवाव्यात·
8· मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर विनाविलंब करावे·
9· निवडणूक पध्दतीत बदल झाला पाहिजे·
10· सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे·"[10]

याच अधिवेशनात अर्जुन डांगळे यांना प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडण्यात आले· 1989 मध्ये महाराष्ट्रातील सर्व गट एकत्र येऊन दलित ऐक्यांचा प्रयत्न केला गेला व महाराष्ट्रातील सर्व दलित संघटना बरखास्त करून "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" या नावाच्या पक्षाची स्थापना करण्याचे ठरले· 19 डिसेंबर 1989 मध्ये दलित ऐक्य झाले· या ऐक्य प्रक्रियेत प्रकाश आंबेडकर व त्यांचा पक्षही सहभागी झाला· परंतु 1989 च्या सार्वत्रिक निवडणूकीत कॉंग्रेस की राष्ट्रीय आघाडी यापैकी कोणाशी युती करावयाची

,यावरून रिपब्लिकन पक्षात पुन्हा दोन गट पडले· रामदास आठवले यांनी कॉंग्रेसशी युती केली तर प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय आघाडीला मदत करण्याचे ठरविले· याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेसची सत्ता आल्यावर रामदास आठवले यांना समाजकल्याण मंत्री हे पद मिळाले तर राष्ट्रीय आघाडीला मदत केल्याने या आघाडीने प्रकाश आंबेडकरांना राज्यसभेवर निवडून आणले व केंद्रात बौध्दांना सवलतीही जाहीर केल्या·

1989 चे दलित ऐक्य हे केवळ भावनेवर झालेले ऐक्य होते· त्यामुळे ते फार काळ टिकले नाही· नंतरच्या काळात प्रकाश आंबेडकरांनी भारिपचे काम अत्यंत वेगाने करावयाला सुरूवात केली· रामदास आठवले यांनी मंत्रीपद स्वीकारून नामांतर या एकाच प्रश्नावर चळवळ आधारित ठेवली· तर प्रकाश आंबेडकरांनी नामांतरासह दलित व इतर सर्व मागासवर्गीय समाजाला बरोबर घेऊन त्यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले·

## भारिप-राज्यव्यापी महिला परिषद

भारिपच्या वतीने भव्य राज्यव्यापी महिला परिषद 8-9 मार्च 1991 रोजी नागपूर येथे घेण्यात आली· या परिषदेमध्ये महत्त्वपूर्ण असे ठराव करण्यात आले·

"1· स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी धर्माचा वापर करणा-या या संधीसाधू राजकीय हुकुमशाही प्रवृत्ती लोकशाही विरोधी असून दलित मुक्ती व स्त्री मुक्ती विरोधी आहेत· याला आळा घालण्यासाठी धर्मांधता व जातीयता विरोधी ठराव करून केंद्र व राज्यशासनाकडे पुढील मागण्या केल्या·

अ· धर्माचा वापर राजकारणात करणा-या पक्षावर कडक बंदी घालावी·

ब· धार्मिक स्थळ, व्यक्ती वा ग्रंथ यांच्या नावाने पुरविल्या जाण-या राजकीय कार्यक्रमांवर ताबडतोब बंदी आणून ते कार्यान्वित करणा-या राजकीय पुढा-यांना अटक करावी·

क· विषमता व अन्याय जोपासणा-या धार्मिक प्रथा, चालीरिती वा रूढी परंपरा यांचे समर्थन करणा-या त्यांचे उदात्तीकरण करणा-या व्यक्तींना अटक करावी·

1· धर्माच्या नावाने हिंसाचार करणा-या व दहशत पसरविणा-या व्यक्तीस अटक करावी·

2· जीवनावश्यक वस्तूंच्या जास्तीत जास्त मर्यादेपर्यंतच्या किंमती शासनाने ठरवून घ्याव्यात·

3· समान कामास समान वेतन व राबणा-या हातास काम दिले पाहिजे·

4· पाणी-जळण-चारा पुरविण्याच्या दृष्टीने योजना आखली पाहिजे·

5· अर्थ संकल्पातील कमीत कमी 12 टक्के रक्कम आरोग्यावर खर्च करावी·

6· पदवी पर्यंतचे स्त्री शिक्षण मोफत असावे·

7· सर्व नोकरी करणा-या तसेच शेतमजूर कामगार स्त्रियांना पाळणाघरे व बाळंतपणाची रजा या सुविधांची अंमलबजावणी झाली पाहिजे ही अंमलबजावणी न करणा-या कारखानदार व मालकांवर कडक कार्यवाही करण्यात यावी·

8· मराठवाडा विद्यापीठास डॉ·बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे·

9· महिलांचे देह प्रदर्शनाचे जाहिरातीव्दारे होणारे विडंबन थांबवावे·

10· मंडल आयोगाची अंमलबजावणी त्वरीत करावी·

11· मागासवर्गीय महिलांना आर्थिक मदत - बिनव्याजी कर्ज पुरवठा करावा·

12· पोटगीची रक्कम पतीच्या पगारातून कपात करून परस्पर कोर्टात जमा करण्यात यावी· तशी पोटगी कायद्यात सुधारणा करावी व व्दिभार्या प्रतिबंधक कायदा कडक करावा·

13· स्त्रियांना समाजात सहभागाची संधी व प्रतिष्ठेची वागणूक मिळाली पाहिजे·

14· विधवा स्त्रियांच्या मुलांच्या विकासाची जबाबदारी शासनाने घ्यावी·

15· स्त्रियांनी छळाला कंटाळून आत्महत्या करू नये तर जिद्दीने संकटाशी व अन्यायाचा सामना करावा"[11]

अशा महत्त्वपूर्ण ठरावांची राज्यव्यापी महिला परिषद भारिपने घेतली· भारिपकडे महिलांचे केडर असल्याने सदर परिषदेला महाराष्ट्रातून बहुसंख्य महिला उपस्थित होत्या·

अशाप्रकारे गायरान जमीन प्रश्न, अतिक्रमण जमिनीची मालकी हक्क आंदोलन, बेकारी, दुष्काळी भागातील प्रश्न, झोपडवासियांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न यावर अनेक चळवळी लढे भारिपने उभे केले व समाजातील सर्व थरातील जनतेमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण केली· भारिपने आपली संपूर्ण राजकीय व सामाजिक चळवळ ही भावनिक न ठेवता माणसांच्या मूलभूत हक्कांच्या संबंधी असणा-या प्रश्नावर चळवळ केंद्रीत केली·

## भारिप आणि निवडणूका / राजकारण

भारतीय रिपब्लिकन पक्षाने आर्थिक व सामाजिक व राजकीय पातळीवर आपले राजकारण सुरु केले· समाजातील सर्व दलित, शोषित, पिडीत, अल्पसंख्याक, आदिवासी, भटके-विमुक्त व इतर सर्व मागासवर्गीयांना बरोबर घेऊन राजकीय सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला· 1984 साली स्थापन झालेल्या भारिपने आपल्या पहिल्याच अधिवेशनात जे ठराव मंजूर केले त्यामध्ये दलित श्रमिकांची सत्ता प्रस्थापन्याचा निर्धार केलेला आहे· एक जातीय राजकारण न करता समाजातील आर्थिक दृष्टया सर्व दुर्बल घटकांना बरोबर घेऊन समस्त जनतेचे राजकारण करण्याचे ठरविले त्यानुसार त्यांनी आपले राजकीय डावपेचही आखले·

मे 1984 मध्ये या पक्षाची पुनर्बांधणी झाल्यावर लगेच डिसेंबर 1984 मध्ये देशात सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या· 1984 ची निवडणूक ही देशातील कॉंग्रेस व्यतिरिक्त सर्वच पक्षांना अवघड जाणारी अशी होती· कारण ऑक्टोबर 1984 मध्ये इंदिरा गांधी यांची हत्या झाली होती· या हत्येची लाट संपूर्ण देशात होती· या भावनिक लाटेमुळे 1984 ची निवडणूक ही कॉंग्रेस पक्षाच्या दृष्टीने सोपी अशी होती· परंतू इतर पक्ष व प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षालाही निवडणूक अवघड होती· देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने भारिप या निवडणूकीत नवखा होता· तरीही भारिपने या निवडणूकीत आपले उमेदवार उभे केले·

डिसेंबर 1984 च्या लोकसभा निवडणूकीत भारिपचे नेते ॲड·प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द केला· तो खालीप्रमाणे होता -

"1. मंडल आयोगाची व मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतराची त्वरीत कार्यवाही.

2. बेकारांना काम व कामगारांना, मजूरांना योग्य वेतन हमी.

3. प्रत्येक नागरिकास स्वस्त घरे व सर्व नागरी सुविधा

4. भूमिहिनांना जमिनी व जमिनीचे राष्ट्रीयीकरण

5. पाण्याचे योग्य वाटप, प्रदुषणास विरोध व किफायतशीर शेतीसाठी शेतीचे नियोजन.

6. महागाई, काळा पैसा व साठेबाजीवर कडक उपाय.

7. स्त्रियांवरील अत्याचाराबाबत कडक उपाय व समान न्याय व समान हक्क.

8. अलिप्त राष्ट्रांशी मैत्री व आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाही विचारांना पाठींबा."[12]

वरीलप्रमाणे आपला जाहीरनामा प्रसिध्द करून प्रकाश आंबेडकरांनी महाराष्ट्रात आपली प्रचार यंत्रणा राबविली. महाराष्ट्रातील अनेक भागात आपले प्रतिनिधी उभे केले. परंतू या निवडणूकीत पक्षाला म्हणावे तेवढे यश मात्र मिळाले नाही. पक्षाने खालीलप्रमाणे उमेदवार उभे करून मताधिक्य मिळविले.

"पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर हे अकोला येथून उभे राहिले होते त्याना या निवडणूकीत एकूण 1 लाख 65 हजार 500 मते मिळाली व ते दुस-या क्रमांकावर राहिले. पुणे येथे जयदेव गायकवाड यांना 20 हजार सातशे मते मिळाली. यवतमाळ येथे डॉ.देवीदास तेळतुगडे यांना 21 हजार 300 मते मिळाली, रामटेक येथे बाबासाहेब ताटेकर यांना 26 हजार 600 मते मिळाली, मराठवाडा हिंगोळी मतदार संघात ॲड.रणधीर तेलगोटे यांना 45 हजार 546 मते मिळाली. ते तिस-या क्रमांकावर राहिले, औरंगाबाद येथे ॲड.बी.एच.गायकवाड यांना 21 हजार 546 मते मिळाली, नांदेड येथे यशवंत आठवले यांना 19 हजार 821 मते मिळाली. खानदेश, जळगाव मतदार संघात राजाराम गाडे यांना 17 हजार मते मिळाली. तसेच चंद्रपूर येथे ॲड.जयश्री हिंगोळे यांना 11 हजार 626 मते मिळी व त्या तिस-या क्रमांकावर राहिल्या."[13]

अशाप्रकारे भारिपच्या पहिल्याच निवडणूकीत या पक्षाला यश प्राप्त झाले नसले तरी पक्षाच्या उमेदवारांना जे मताधिक्य मिळाले ते खरोखरच यशस्वी होते असे

म्हणायला हरकत नाही.

पक्षाला 1984 च्या सार्वत्रिक निवडणूकीत यश मिळाले नसले तरी 1985 मध्ये नगरपालिका व महानगर पालिकेच्या निवडणूकीत पक्षाला चांगलेच यश मिळाले.

"1985 साली मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूकी पक्षाला 1 जागा मिळाली तर पुणे महानगरपालिका निवडणूकीत 2, अकोला 14, खोपोली नगरपरिषद 3 असे प्रतिनिधी निवडून आले."[14]

## नांदेडची लोकसभा पोटनिवडणूक

1986 साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी राजीनामा दिला. त्यांच्या जागी केंद्रीय गृहमंत्री श्री.शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी आपल्या लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे नांदेड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. या पोटनिवडणूकीत कॉंग्रेसने श्री.चव्हाण यांचे चिरंजीव श्री.अशोक चव्हाण यांना उभे केले. भारिपचे नेते ॲड.प्रकाश आंबेडकर हे ही विरोधी पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले. यावेळी त्यांना शेतकरी संघटनेने पाठिंबा दिला होता. ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली आणि नांदेड मतदार संघामध्ये पहिल्यांदाच श्री.शंकरराव चव्हाण यांचेपुढे आव्हान उभे राहिले. या निवडणूकीत अंतिमतः कॉंग्रेसचा उमेदवार विजयी ठरला. परंतु विधानसभेच्या अनेक मतदारसंघात श्री.आंबेडकर यांनी बहुमत मिळविले होते. पुढे 1989 च्या लोकसभा निवडणूकीत जर आंबेडकर त्याच मतदार संघात उभे राहिले असते तर ते कदाचित निवडून आले असते. कारण त्यांनी निर्माण केलेल्या मतदार संघातील जागृतीमुळे 1989 साली जनता दलाचे उमेदवार डॉ.व्यंकटेश काबदे निवडून आले होते.

1990 च्या निवडणूकीत मात्र पक्षाला बऱ्यापैकी यश मिळाले. 1990 च्या विधानसभा निवडणूकीपूर्वी दलित ऐक्याची प्रक्रिया झाली होती. रामदास आठवले यांच्या आर.पी.आय. ला महाराष्ट्रात कॉंग्रेस युतीमुळे एकूण 12 जागा मिळाल्या होत्या. परंतु त्यांच्या पक्षाचा एकही उमेदवार निवडणूकीत यशस्वी झाला नाही. मात्र भारिपचे श्री.मखराम पवार यांना अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर मतदारसंघात दिलेली उमेदवारी

ही यशस्वी ठरली· पक्षाने विधानसभेच्या दोन जागा जिंकल्या आणि चांगल्या प्रकाराची मते मिळवली·

1990 नंतर मात्र अॅड·प्रकाश आंबेडकरांनी आपल्या राजकीय व्यूहनीतीमध्ये अंशतः बदल केला· त्यांनी वर्ग आणि जात पातळीवर सर्व शोषितांचे संघटन करण्याचा विचार केला· दलितांबरोबर इतर सर्व मागासवर्गीय जातींचा पाठींबा मिळाल्याशिवाय सत्ता हस्तगत करता येणार नाही· या दृष्टीने त्यांनी महाराष्ट्रात "बहुजन महासंघ" स्थापन केला·

## भारिपची दलित मुक्तीची संकल्पना

दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये महाराष्ट्रात व देशात भारतीय रिपब्लिकन पक्षाने अत्यंत महत्त्वपूर्ण असे प्रयत्न केलेले आहेत· फक्त एका जातीपुरते राजकारण न करता दलितासह सर्व श्रमिक, गरीब, शोषित व इतर मागासवर्गीयांची आघाडी निर्माण करून अंतिमतः सर्व दलितांना सत्तेच्या राजकारणात आणून आपले मानवी हक्क मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे·

1984 साली स्थापन झालेल्या या पक्षाने दलितांच्या भौतिक गरजांचा विचार केला· जमिनीचे राष्ट्रीयीकरण, साखर कारखाने सरकारने ताब्यात घ्यावेत, यासाठी जे लढे उभे केले ते दलित मुक्तीच्या दृष्टीने महत्त्वाचे होते· दलितांची चळवळ ही फक्त भावनिक न राहता· वास्तववादी दृष्टीकोनातून सर्व दलितांच्या मूलभूत गरजांची पूर्तता कशी करता येईल· या दृष्टीने भारिपने प्रयत्न केले· बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत दलितासह सर्व बहुजनांना एकत्र करण्याचा भारिपचा जो प्रयत्न आहे तो महत्त्वाचा आहे· सामान्य माणसांच्या हातात सत्ता देण्यासाठी त्यांची ही व्यूहनीती सुध्दा महत्त्वाचीच म्हणावी लागेल·

## बहुजन महासंघ

सध्याच्या देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करता असे दिसते की, राजकीय सत्ता ही मूठभर अशा प्रस्थापित उच्चवर्णीय लोकांच्या हाती एकवटलेली

आहे. त्यामुळे संख्येने निम्म्यापेक्षा जास्त असणारा मध्यम जाती गट व इतर दलित आदिवासी व अल्पसंख्यांक समाज हा सत्तेच्या राजकारणापासून पूर्णपणे वंचित आहे आणि पुढारलेल्या अशा मूठभर उच्चवर्णियं जातींनी या संख्येने जास्त असणा-या बहुजन समाजास राजकीय सत्तेपासून बाजूलाच ठेवलेले आहे. आणि हे मूठभर लोक बहुजन समाजावर पिढयान्पिढया सत्ता प्रस्थापित करून त्यांचेवर अन्याय करीत आहेत. "महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले यांनी सत्यशोधक चळवळ केली. ती बहुजनांची होती. तिचे रूपांतर पुढे ब्राह्मणेतरांच्या चळवळीत झाले. या चळवळीचा जोम व शक्तीचा परिणाम म्हणून के.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्यावेळी कॉंग्रेस-बहुजनांच्या आकांक्षाचे प्रतीक वाटत असे."[15] परंतू आजची परिस्थिती पाहता असे दिसते की महाराष्ट्रातील उच्चवर्णिय मराठा समाजाने "बहुजन समाजाचे कल्याण" या नावाखाली मराठेत्तर बहुजन समजाला राजकीय सत्तेपासून दूर ठेवले आहे व आपल्याच हाती संपूर्ण सत्तासूत्रे केंद्रित केली आहेत. त्यामुळे अलिकडच्या काळात भारिपचे नेते खा.प्रकाश आंबेडकर व मखराम पवार यांनी भटके विमुक्त, आदिवासी, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्ग व दलितांसह सर्व बहुजन समाजातील जाती-जमातींचे एकसंध संघटन झाले तर सामाजिक व राजकीय शक्ती उभी राहू शकते हा विचार पुढे आणला व यातूनच 1990 नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात "बहुजन महासंघ" नावाचा नव्या राजकीय प्रयोगाचा उदय झाला.

## बहुजन महासंघाची स्थापना

महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा हरवलेला आत्मविश्वास, आत्मसन्मान परत मिळवून देण्यासाठी बहुजन समाजाची सामर्थ्यशाली एकसंघ शक्ती उभारून बहुजन समाजाची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी बहुजन महासंघाची स्थापना झाली. सुरूवातीला "23 ऑगस्ट 1990 या दिवशी अकोल्यात "बहुजन समाज महासंघ" या जिल्हास्तरावरील संघटनेची स्थापना झाली."[16] या संघटनेची स्थापना भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर येथील आमदार मखराम पवार यांनी केली आणि या संघटनेने प्रथमपासून भारिपबरोबर वाटचाल केली. नंतरच्या काळात मखराम पवारांनी या संघटनेला व्यापक राजकीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,

भटक्या-विमुक्त जाती, मंडल आयोगांतर्गत आलेल्या 272 इतर मागास जाती व अल्पसंख्याक जाती-जमातीतील काही पुरोगामी व्यक्तींना एक निवेदन पाठविले व त्यांच्या "निमंत्रणावरून दि.15 फेब्रुवारी 1993 रोजी के.सी.कॉलेज हॉल, चर्चगेट मुंबई येथे "महाराष्ट्र बहुजन समाज मेळावा" आयोजित करण्यात आला होता. डॉ.ए.टी.भोपळे अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्रातून सुमारे एक हजार प्रतिनिधी मेळाव्याला आले होते. त्या सर्वांनी मिळून "बहुजन महासंघा"ची स्थापना केली. त्यावेळी भारिपचे नेते खा.प्रकाश आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले."[17]

मुंबई येथे झालेल्या बैठकीत बहुजन महासंघाची राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कार्यकारिणी निवडण्यात आली ती पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| "1. | अध्यक्ष | : आमदार मखराम पवार |
| 2. | महासचिव | : आमदार विजय मोरे |
| 3. | महासचिव | : श्री.शांताराम पेंदरे |
| 4. | महासचिव | : श्री.नवनाथ आव्हाड |

बहुजन महासंघाचे जिल्हा अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| 1. | अकोला | : डॉ.दशरथ भांडे |
| 2. | बुलढाणा | : श्री.बापूराव केणे |
| 3. | अमरावती | : श्री.नामदेवराव गावरकर |
| 4. | यवतमाळ | : ॲड.सुधाकर जाधव |
| 5. | नागपूर | : श्री.ज्ञानेश्वर काकडे |
| 6. | चंद्रपूर | : श्री.वामनराव शिगंम |
| 7. | नांदेड | : प्रा.आत्माराम वानुले |
| 8. | परभणी | : श्री.हरीभाऊ शेळके |
| 9. | जालना | : ॲड.उत्तमराव राठोड |
| 10. | औरंगाबाद | : प्राचार्य भाऊराव नावाडे |

| | | |
|---|---|---|
| 11. | लातूर | : श्री. भगवानराव नागरगोजे |
| 12. | बीड | : श्री. हणमंतराव उपरे |
| 13. | अहमदनगर | : श्री. रवींद्र सानप |
| 14. | जळगांव | : श्री. मेहताबसिंग नाईक "[18] |

अशाप्रकारे "बहुजन महासंघाची" रीतसर स्थापना झाली. भारिपचे नेते खा. प्रकाश आंबेडकर सुरूवातीपासून महासंघाचे प्रणेते राहिले. महासंघाची स्थापना झाल्यावर दिनांक 21/3/1993 रोजी गजानन महाराजांचे शेगाव जि. बुलढाणा येथे महासंघाचे राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचे ठरले. स्थापनेनंतर महासंघाच्या वतीने खालील महत्त्वाचे ठराव मांडले.

## बहुजन महासंघाचे ठराव

"ठराव क्र. 1 : **भारतीय संविधानावर खरी श्रध्दा व निष्ठा**"

"बहुजन महासंघ" ही संघटना कायद्याव्दारे स्थापित झाली आहे. अशा भारतीय संविधानाबद्दल खरी श्रध्दा व निष्ठा बाळगेल. भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखण्यासाठी प्रयत्नशील राहील. भारतीय संविधानात अंतर्भूत असलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तत्वाशी आमची संघटना बांधील राहील.

ठराव क्र. 2 : **बहुजन हिताय बहुजन सुखाय - घोषवाक्य चौरंगाध्वज**

"बहुजन महासंघ" या संघटनेचे घोषवाक्य "बहुजन हिताय बहुजन सुखाय" असे असेल. संघटनेचा ध्वज चौरंगा असेल, ज्यामध्ये निळा, केसरी, पांढरा आणि हिरवा या रंगाच्या समान लांबीच्या व समान रुंदीच्या चार पट्टया एकमेकांना जोडलेल्या असतील. प्रत्येक रंगाच्या पट्टीची रुंदी तिच्या लांबीच्या 1/3 असेल. निळी पट्टी डाव्या बाजूने उभी असेल व तिला आडव्या पध्दतीने वर केसरी मध्ये पांढरी व खाली हिरवी पट्टी जोडलेली असेल. अशा पध्दतीने चौरंगा ध्वज तयार होईल. ध्वजाच्या पांढ-या रंगाच्या आडव्या जोडलेल्या पट्टीच्या मधोमध ऐक्य आणि शक्तीचे प्रतीक म्हणून उजव्या हाताची बंदमूठ उभी, परंतू हाताच्या बंद मुठीचा बंद अंगठा ध्वजाच्या उजव्या बाजूला राहील, अशा रितीने बंदमूठ निळ्या रंगाने चित्रित केलेली असेल.

### ठराव क्र. 3 : संपूर्ण मंडल आयोग राबवा "क्रिमीलेअर" सिध्दांत अमान्य

सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर 92 मध्ये दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार देशातील सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास जातींना मंडल आयोगाने सुचविल्याप्रमाणे 27 टक्के आरक्षण तातडीने देणे अत्यंत गरजेचे असतानाही केंद्र व राज्य शासनाने सदर आरक्षणाची तरतूद अजूनपर्यंत लागू केलेली नाही व मंडल आयोगाच्या शिफारशींना निष्प्रभ करण्याचा कुटी प्रयत्न चालविलेला आहे. बहुजन समाजाला सवलतीपासून वंचित ठेवल्याचा शासनाच्या धोरणाचाच हा परिपाक आहे.

वास्तविक पाहता 52 टक्के बहुजन समाजाला (इतर मागास जाती) अनु.जाती जमातीप्रमाणे संख्येच्या प्रमाणात 52 टक्के राखीव जागा मिळणे न्याय संगत असतानाही मंडल आयोगाने बहुजन समाजाला पूर्ण न्याय न देता अर्धा न्याय दिला आणि हा अर्धा न्यायही देण्यात शासन अशीच दिरंगाई करीत आहे.

म्हणून आमची स्पष्ट मागणी आहे की, मंडल आयोगाच्या सर्व शिफारशीची शासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी व बहुजन समाजाला विनाविलंब न्याय द्यावा.

मंडल शिफारशींच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक निकषाचा सिध्दांत पूर्णपणे अमान्य केलेला असतानाही भारत सरकारने नेमलेल्या तडस समितीने दिलेला आणि आर्थिक निकषावर अवलंबून असलेला अहवाल शासनाने तात्काळ अमान्य करावा.

### ठराव क्र.4 : बहुजन समाजाचा शंकराचार्यांच्या किमान दोन धर्मपीठांवर अधिकार आहे !

आम्ही बहुजन समाजातील सर्व लोक आजवर हिंदू म्हणूनच वावरत आलेलो आहोत. परंतु धर्माच्या नावावर आम्हाला चातुर्वर्ण्याच्या पोलादी चौकटीत डांबण्यात येऊन अमानुष वागणूक देण्यात आली आणि अपमानीत जीवन जगण्याला भाग पाडण्यात आले. आम्हाला पवित्र धर्मशास्त्राचे अध्ययन करण्याचा हक्क नाकारण्यात आला. परिणामी संबंध बहुजन समाज हा भक्तीमार्गाकडे व वारकरी पंथाकडे वळला. भक्तीमार्ग स्वीकारल्यानंतर देखील बहुजन समाजाला मान व सन्मान दिला गेला नाही. उच्च-निच्चतेची भावना

भावना पध्दतशीरपणे जोपासण्यात आली· अशा या सामाजिक व धार्मिक परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व इतर धार्मिक संघटना नव्याने सर्व हिंदू धर्मियांचे संघटन करावयास निघाला आहे· हिन्दू समाजामध्ये वैदिक परंपरा आणि भक्ती मार्गाची परंपरा या दोन मुख्य वाटा आहेत· राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यांच्या संलग्न संघटना या वैदिक परंपरा मानणा-या आहेत· त्यांनीही अजूनही भक्ती मार्गाला मान्यता व प्रतिष्ठा दिलेली नाही· भक्तीमार्ग संप्रदायात देखील अनेक विद्वान पंडित, विख्यात प्रवचनकार व किर्तनकार आज उपलब्ध आहेत· हिंदू धर्मामध्ये शंकराचार्यांचे पद हे सर्वोच्च प्रतिष्ठेचे व मानसन्मानाचे पद आहे असे मानले जाते· बहुजन समाज हा हिन्दू असून हिन्दू धर्मात बहुसंख्येने वावरतो आहे आणि म्हणून शंकराचार्यांच्या धर्मपीठावर बहुजन समाजाचाही अधिकार आहे· राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यांच्या इतर संघटनांकडे आणि हिन्दू धर्मातील शंकराचार्यांच्या पिठाधीशांकडे आमची अशी मागणी आहे की, जर ते सर्व हिंदूंना समान समजत असतील व हिंदू एकतेची त्यांची भूमिका प्रामाणिक असेल तर शंकराचार्यांच्या चार धर्मपीठापेकी किमान दोन धर्मपीठांवर बहुजन समाजातील भक्तीमार्ग परंपरेतील दोन व्यक्तींची शंकराचार्य म्हणून नेमणूक करावी व ती नेमणूक ते कधी करतात, त्याची तारीख जाहीर करावी· जर अशी नेमणूक करायची त्यांची तयारी नसेल तर हिन्दू धर्माच्या नावाखाली बहुजन समाजाचा बुध्दीभेद करण्याचे त्यांनी त्वरीत बंद करावे·

ठराव क्र·5 : **ग्रामीण कृषि औद्योगिकरणाचे धोरण**

महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील जिल्हा परिषद मतदार संघ निहाय ग्रामीण औद्योगिक वसाहत स्थापन करून संबंधित जि·प·मतदार संघामध्ये शेतीमध्ये पिकणा-या शेत-मालावर प्रक्रिया करणारे विविध उद्योग काढण्यात यावेत व त्या औद्योगिक वसाहतीत संबंधित जि·प· सर्कलमधील बेकार तरूण-तरूणींना रोजगार मिळवून द्यावा· तसेच या उद्योगातील नफा त्या शेतमाल पिकवणा-या शेतक-याकडे त्यांनी पिकवलेल्या मालाच्या प्रमाणात विभागून द्यावा· यासाठी आवश्यक रक्कम राष्ट्रीयकृत बँकांनी या उद्योगांना पुरवावी·

ठराव क्र. 6 : वनजमिनीचे भूमिहिनांना वाटप करा.

आज अस्तित्वात असलेल्या पध्दतीप्रमाणे महाराष्ट्र शासन आपल्या वनविभागामार्फत वनजमिनीमध्ये करोडो रुपये खर्चून जंगल निर्मिती व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी विविध झाडांची रोपे लावल्याचे दाखवत आहेत. परंतु प्रत्यक्षात वर्ष दोन वर्षानंतर त्या ठिकाणी कुठलेही वन उभे राहिलेले दिसत नाही व जनतेचे करोडो रुपये पाण्यात जातात. हे टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ज्या ठिकाणी उजाड वनजमिनी किंवा अत्यल्प झाडांची संख्या असलेल्या वनजमिनीपैकी भूमिहीन शेतमजूर कुटुंबाला प्रत्येकी पाच एकर वनजमीन ताब्यात द्यावी व त्यांच्या देखरेखीखाली वनजमिनीवर शासकीय खर्चाने वनीकरण करुन द्यावे. सदर वनीकरणाची योग्य निगा राखण्याची जबाबदारी संबंधित भूमिहीन शेतमजूर कुटुंबावर राहील. सदर वनजमिनीतील उत्पन्नाचा 3/4 भाग संबंधित शेतमजूर कुटुंबाला द्यावा व केवळ 25 टक्के उत्पन्न सरकारने घ्यावे.

ठराव क्र. 7 : सर्वांना समान व सक्तीचे शिक्षण

महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित शैक्षणिक धोरणाचा परिणाम म्हणून बहुजन समाजाला विशेषतः ग्रामीण भागातील बहुजन समाजाला अत्यंत निकृष्ट दर्जाचे शिक्षण देण्यात येत आहे. त्यामुळे बहुजन समाजातील मुलामुलींच्या शिक्षणाची संपूर्णपणे वाताहात झाली आहे. राज्यघटने अंतर्गत देशातील प्रत्येक मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करुन देण्याची स्पष्ट जबाबदारी शासनावर टाकलेली असतानाही शासन घटनेच्या या तरतुदीची पायमल्ली करीत आहे.

म्हणून बहुजन महासंघाचे असे स्पष्ट धोरण आहे की, महाराष्ट्रातील ग्रामपंचायत क्षेत्रात राहणा-या प्रत्येक मुला-मुलीच्या मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण संपूर्णपणे मोफत द्यावे व ते सक्तीचे करावे.

हे करण्यासाठी ग्रामीण भागातील प्रत्येक शाळा ही आश्रम शाळेच्या धर्तीवर निवासी शाळा असावी व ती निवासी शाळा चालविण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्विकारावी." [19]

## बहुजन कोण ?

"सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेने ज्या जाती समूहांना वंचित ठेवले ते सारे बहुजन. बौध्द, शिख, जैन, मुसलमान, ख्रिश्चन वगळून बाकी सारे बहुजन. मुख्यतः स्वतःला हिंदू म्हणवून घेतात. सर्व आदिवासी भटके विमुक्त यात येतात. बौध्द, शीख, जैन, ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मातील बहुसंख्य जनता ही मूळची भारतीय शूद्र-अतिशूद्र जनता आहे. ब्राह्मण स्त्रियांसह सर्व स्त्रिया शूद्र आहेत. थोडक्यात महात्मा जोतिराव फुले यांच्या परिभाषेत सांगायचे तर स्त्री शूद्रातिशूद्र म्हणजे बहुजन समाज. अनुसूचित जाती-जमाती, भटके विमुक्त, इतर मागास जात व अन्य धार्मिक समूह व स्त्रिया यात येतात."[20]

## विचारसरणी

बहुजन महासंघाने आपली एक विशिष्ट अशी विचारसरणी मांडलेली आहे ती महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, "भारतात वर्ण-जाती आणि स्त्रियांची गुलामगिरीची व्यवस्था आहे. तिला वैदिक ब्राह्मणी धर्म-संस्कृतीचा आधार आहे. या ब्राह्मणी वैदिक संस्कृती मध्ये मनुष्याच्या कष्टाला अजिबात प्रतिष्ठा नाही तर फक्त बुध्दीलाच प्रतिष्ठा आहे. आर्य-वैदिक-ब्राह्मण संस्कृतीने पुनर्जन्म कल्पना, असत्य, हिंसा, परस्पर व्देष, वंश-वर्ण-जाती, लिंग, श्रेष्ठत्व, स्त्रियांची गुलामगिरी, विषमता शोषण यासारखी हुकूमशाही प्रवृत्तीची नीती-मूल्ये जपली आहेत आणि या वैदिक संस्कृतीनेच मनुस्मृती हा ग्रंथ अधिकृत मानला आहे. बौध्द, जैन आणि शीख हे स्त्री-शूद्रातिशूद्रांचे धर्म आहेत. वैदिक व ब्राह्मणी धर्मा विरूध्द त्यांनी उठाव केले. मुसलमान व ख्रिश्चन धर्म हे बाहेरून आले आहेत. या धर्मामध्ये वर्ण-जाती व्यवस्था नाही हे एकेश्वरी धर्म आहेत. त्यामुळे वैदिक ब्राह्मणी धर्माच्या गुलामगिरीतून आपली सुटका करून घेण्यासाठी स्त्री-शूद्रातिशूद्रांनी मोठया प्रमाणात मुस्लीम व ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. इंग्रज, मुसलमान, मोंगल हे बाहेरून आले व निघूनही गेले. परंतू धर्मांतरीत मुस्लीम व ख्रिश्चन हे येथेच राहिले ही जनता बौध्द, शीख, जैनांप्रमाणे मूळची भारतीय आहे. भारतात वारकरी, सूफी संप्रदायाची चळवळ आणि चक्रधर स्वामींचा महानुभाव पंथ यांनी वैदिक परंपरेविरूध्द उठाव केला होता. बहुजनांची संस्कृती ही

येथील मातीशी नातं सांगणारी आहे· चार्वाक, बौध्द, जैन, शीख, मुसलमान, ख्रिस्चन, वारकारी, सूफी महानुभाव संप्रदाय इत्यादींच्या समन्वयातून बहुजन संस्कृती विकसित झाली· बहुजन समाजाची संस्कृती ही मर्यादित नाही· तीच खरी भारतीय संस्कृती आहे·

सत्य, अहिंसा, प्रज्ञा, शील, करूणा, समता, स्वातंत्र्य, परस्पर स्नेहभाव सामाजिक न्याय, गतिमानता आणि लोकशाही ही नीती-मूल्ये या बहुजन सांस्कृतिक प्रवाहातून विकसित झाली आहेत· या बहुजन संस्कृतीला वैदिक ब्राह्मणी धर्माने कधीच मान्यता दिली नाही· उलट बहुजनांची संस्कृती दडपून टाकण्याचाच प्रयत्न केला·"[21] त्यामुळे बहुजन महासंघ हा आपले नाते या देशातील वारकरी संप्रदाय आणि सूफी संप्रदायाशी जोडतो· वारकरी व सूफी परंपरा ही बहुजनांची खरीखुरी संस्कृती आहे, असे ते मानतात· भारतातील धर्मव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या विरोधात चार्वाक, बुध्द, महावीर यांनी उठाव केला· पुरोहितशाही विरूध्द बंड केले आणि सामाजिक, आर्थिक, समता प्रस्थापित केली· संत कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, जनाबाई, शेख मंहमद, चोखा, रोहिदास, एकनाथ आदि बहुजन संत परंपरा आहे· आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, धर्म संसद, विश्व हिंदू परिषद, भा·ज·पा·, शिवसेना व संघ परिवार, हिंदू संस्कृतीपेक्षा आर्य-वैदिक परंपरा मानतो आणि तमाम हिंदू धर्मियांच्या नावाने देशाची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सत्ता काबीज करण्याचे कुट कारस्थान करीत आहे· त्याविरूध्द बहुजन महासंघ बहुजनांचे संघटन करून आवाज उठवू इच्छितो·

मंडल आयोगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या या 272 जाती महाराष्ट्रात आहेत असे ठरविले आहे· महाराष्ट्रातील व देशातील एकूण लोकसंख्येच्या मानाने विचार करता अनुसूचित जाती-जमाती, भटके विमुक्त, मुसलमान, बौध्द, जैन ख्रिश्चन धर्मातील मागासजाती मिळून 85 टक्के समाज हा बहुजनांमध्ये मोडतो· हा बहुसंख्य बहुजन समाज मूठभर उच्चवर्णियांच्या हाताचे बाहुले होऊन बसला आहे· देशात 85 टक्के बहुजन आहेत पण ते विविध जाती-जमातीत विसरले गेले आहेत· त्यामुळे या बहुजन समाजाने आपला आत्मविश्वास गमावला आहे· या बहुजन समाजाचा हरवलेला आत्मविश्वास जागृत करून देशाच्या राजकीय सत्तेमध्ये त्यांचा सहभाग वाढावा या दृष्टीने

बहुजन महासंघाचा प्रयत्न आहे·

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टया बहुजन समाज परिपूर्ण व्हावा व सत्तेची स्थाने मूठभर लोकांच्या हातात न राहता बहुजन समाजाच्या हातात रहावीत यासाठीच आ·मखराम पवार व खा·प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तिसरी शक्ती म्हणून बहुजन महासंघाची निर्मिती करण्यात आली·

## शेगावचे अधिवेशन

21 मार्च 1993 रोजी बहुजन महासंघाचे राज्य पातळीवरील पहिले विराट अधिवेशन शेगाव येथे पार पडले· महासंघाचे अध्यक्ष आ·मखराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली व महासंघाचे प्रणेते खा·प्रकाश आंबेडकर यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले· या अधिवेशनाला निळूभाऊ फुले, राम नगरकर, भारिप प्रदेशाध्यक्ष अर्जुन डांगळे इ·प्रमुख उपस्थित होते·

या अधिवेशनात "बहुजन महासंघात अकोला येथील कॉंग्रेसचे नेते महादेवराव बुंदेले, प्रकाश ताथाडे, शंकरराव पाटणकर, सुनील गौड, देवानंद मदाने, खामगाव येथील श्री·रामचंद्र त्रिकाळ पाटील यांनी बहुजन महासंघात प्रवेश केला" [22] या अधिवेशनामध्ये बहुजन समाजाचा फायदा संघ परिवार व कॉंग्रेस यांना करू देणार नाही, असा निर्धार करण्यात आला· नव्या जोमाने महाराष्ट्रातील बहुजनांचे प्रभावी संघटन करण्याचा संकल्पही करण्यात आला· या अधिवेशनास भारिप आपली सर्व शक्ती बहुजन महासंघाच्या पाठीशी उभी करेल अशी घोषणा भारिप प्रदेशाध्यक्ष अर्जुन डांगळे यांनी केली·

महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजाचे संघटन होण्या अगोदरच भारताच्या दलित राजकारणामध्ये 1985 नंतर श्री·कांशीराम आणि मायावती यांनी एक नवा राजकीय प्रवाह सुरू केला· उत्तर भारतामध्ये इतके दिवस दलित मतदान हे कॉंग्रेसच्या बाजूने होत होते· परंतू श्री·कांशीराम यांची बहुजन समाज पक्षाची स्थापना करून दलितांचा नवा पक्ष उभा केला· त्यांच्या मते ब्राह्मण, ठाकूर आणि बनिया यांना वगळून इतर सर्व जे लोक आहेत ते बहुजन आहेत· समाजात त्यांची संख्या शेकडा 85 टक्के असतानाही

उत्तर भारतातील राजकीय सत्ता ब्राह्मण आणि ठाकूर या अल्पसंख्य जमातीकडे केंद्रित झाली आहे. सर्व बहुजनांना एकत्र आणण्याचा प्रयत्न श्री.कांशीराम यांनी गेली दहा वर्षे चालविला आहे. कांशीराम हे स्वतःला डॉ.आंबेडकरांचे शिष्य मानतात. त्यांच्या चळवळीने उत्तर प्रदेशात मोठी जागृती निर्माण केली आणि दलितांची स्वतंत्र अस्मिता निर्माण झाली. अलिकडील काळात ब.स.पा.ने जो पाठिंबा उत्तर भारतात मिळविला त्यावरून समाज बदलास तयार आहे असे चित्र निर्माण झाले. महाराष्ट्रात सर्व बहुजनांना एकत्र करून उत्तर प्रदेशाप्रमाणेच राजकीय सत्ता मिळविण्याचा बहुजन महासंघाचा प्रयत्न आहे.

## बहुजन महासंघ-भारिपचे राजकारण

23 ऑगस्ट 1990 रोजी भारिप चे आ.मखराम पवार यांनी अकोला येथे "बहुजन समाज महासंघ" या जिल्हास्तरीय संघटनेची स्थापना केली आणि या संघटनेने सुरुवतीपासूनच भारिपबरोबर वाटचाल केली. 1990 नंतर ख-या अर्थाने बहुजन महासंघ व भारिपने समाजातील बौध्द, दलित, मुस्लीमासह सर्व बहुजन समाजाला बरोबर घेऊन आपले राजकीय डावपेच आखले आणि त्यात त्या शक्तीला काही प्रमाणात यश प्राप्त झाले.

## अकोला पॅटर्न

फेब्रुवारी 1992 च्या अकोला जिल्हा परिषद निवडणूकीच्या वेळी अकोला जिल्हयात भारिप-बहुजन समाज महासंघाने संयुक्तपणे एक नवा प्रयोग केला. जिल्हयातील कॉंग्रेसची सत्ताधारी घराणी आणि संघ परिवारातील महाजन यांना वगळून तमाम बहुजनांची शक्ती उभी केली. सत्तेच्या राजकारणात एक "जात" ऐवजी "बहुजन" या भावनेने मतदान करा ही भूमिका घेतली. खा.प्रकाश आंबेडकर व आ.मखराम पवार यांच्या नेतृत्वाखाली "बहुजन" नव्या अस्मितेने अकोला जिल्हा पेटून उठला व निवडणूकीत भारिप-बहुजन महासंघास प्रचंड यश मिळाले. बहुजन समाजातील धनगर, कुणबी, गोंधळी, साळी, टाकणकार, पारधी, बंजारा, हटकर, बौध्द, मुसलमान अशा सर्व जातीधर्मांचे प्रतिनिधी सत्तेमध्ये आले यालाच "अकोला पॅटर्न" असे म्हणतात.

1992 च्या अकोला जिल्हा परिषदेच्या निवडणूकीविषयी आ·मखराम पवार म्हणतात, "बहुजन समाज महासंघाच्या बहुजन समाजाची व इतर सर्व शोषित समाजाची सामाजिक व राजकीय एकी करण्याचा अकोला जिल्हयामध्ये जो जाणीवपूर्वक प्रयत्न झाला, त्याचा दृश्य परिणाम या परिषद निवडणूकीत दिसून आला· भारतीय रिपब्लिकन पक्ष व बहुजन समाज महासंघाचे 60 पैकी जवळ जवळ 15 उमेदवार जिल्हा परिषद सदस्य म्हणून प्रचंड बहुमताने निवडून आले·

आमचे 20 जिल्हा परिषदेचे उमेदवार केवळ 100 ते 200 मतांच्या फरकाने पराभूत झाले· बहुजनातीलच ही लोकांची मामुली चूक झाल्यामुळे आमचे 20 उमेदवार पराभूत झाले· चुका करणा-यांनी रडून आपली चूक नंतर माझेजवळ कबुलही केली· अन्यथा अकोला जिल्हा परिषद आज बहुजन समाज महासंघ व भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या ताब्यात राहिली असती· बहुजन समाज महासंघाचा एवढा जबरदस्त रेटा होता की भा·ज·प· व सेनेचे अकोला जिल्हा परिषदेचे निवडणूकीमध्ये सर्व उमेदवार पराभूत झाले· त्यापैकी अनेकांच्या अनामत रकमा जप्त झाल्या·····

बहुजन समाज महासंघाने दोन माजी आमदारांना चारी मुंडया चीत केले· तर एक माजी आमदार आमच्या आदिवासी उमेदवाराच्या सपाटयातून आपल्या राजकीय बनवेगिरीच्या जोरावर कसाबसा थोडक्यात वाचला· अकोला जिल्हयाचा कॉंग्रेस पक्षाचा अध्यक्ष आमच्या मुस्लीम उमेदवाराच्या दणक्यामुळे तिस-या क्रमांकावर फेकला गेला व त्याला दारूण पराभव पत्करावा लागला· अकोला जिल्हयातील अनेक करोडपतींच्या विरूध्द आम्ही शेतमजूर वर्गातील उमेदवार उभे केले होते· पैशाचा प्रच्छन्न वापर करूनही त्या कोटयाधीश उमेदवारांना आमच्या मजूर उमेदवाराकडून दारूण पराभव पत्करावा लागला·

अकोला जिल्हयातील 13 पंचायत समितीच्या निवडणूकीमध्ये 120 उमेदवारापैकी भारतीय रिपब्लिकन पक्ष व बहुजन समाज महासंघाचे 30 उमेदवार निवडून आले आणि जवळ जवळ 48 उमेदवार मताच्या अत्यंत कमी फरकाने पराभूत झाले· अकोला जिल्हयाच्या अकोला व बार्शी टाकळी या दोन्ही अत्यंत प्रतिष्ठेच्या पंचायत समित्या भारतीय रिपब्लिकन पक्ष व बहुजन महासंघाने धनदांडग्या सत्तेच्या मक्तेदाराकडून हिसकावून घेतल्या·

बोर्शी टाकळी पंचायत समितीमध्ये श्री·बी·आर·शिरसाट हे आमचे बौध्द सदस्य सभापती म्हणून काम करत आहेत तर अकोला पंचायत समितीत आमचे मेंढी चारणारे धनगर सदस्य श्री· हरीदासजी भदे हे सभापती म्हणून कार्यरत आहेत·

मूर्तीजापूर पंचायत समितीत आमच्या सहकार्याने श्री·बबन दाबेराव हे टाकोणकर (गावपारधी) समाजाचे सदस्य सभापती म्हणून काम करतात तर दर्यापूर पंचायत समितीत श्री·वासुदेवराव खेडकर हे आमचे कोळी सदस्य सभापती म्हणून निवडून आले आहे· कारंजा व बाळापूर पंचायत समित्या केवळ एक-एक सदस्य कमी पडल्यामुळे आमच्या हातातून गेल्या याचे आम्हाला अतिशय दुःख होत आहे· विशेष नमूद करण्यासारखी बाब अशी की, अकोला जिल्हयातील या पंचायत समित्या सोडून उर्वरीत महाराष्ट्रात विरोधी पक्षाच्या ताब्यात एकही पंचायत समिती नाही· अकोला जिल्हयातील भा·ज·प· व शिवसेना तेथे शेवटचे आचके देत आहेत·"[23] अशाप्रकारे अँड·प्रकाश आंबेडकर व आ· मखराम पवार यांनी भारिप बहुजन महासंघाचा जो अकोल्यात प्रयोग सुरू केला· हा प्रयोग जर संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वी झाला तर काँग्रेस व भाजपा, शिवसेना यांना प्रतिकार करण्यासाठी भारिप बहुजन महासंघ तिसरी शक्ती म्हणून निश्चित उभी राहील·

## किनवटीची निवडणूक

महाराष्ट्राचा राजकारणामध्ये अशा प्रकारे व्यापक आणि पुरोगामी विचार घेवून भारिप-बहुजन महासंघाने आपली वाटचाल सुरू केली· या काळात उत्तर भारतामध्ये मंडल आयोगाच्या प्रश्नावरून बरीच जागृती झाली होती· दक्षिण भारतातही शोषित वर्ग जागृत होत होता· परभणी जिल्हयातील किनवट मतदार संघातील जागा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आ·सुभाष जाधव यांच्या अपघाती मृत्यूमुळे रिकामी झाली होती· या मतदार संघात अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय समाजाची मोठी संख्या होती· भारिप-बहुजन महासंघाचे श्री·भिमराव केराम हे पक्षाचे उमेदवार होते· या निवडणूकीत काँग्रेसचे जेष्ठ पुढारी श्री·उत्तमराव राठोड यांचा पराभव करून श्री·केराम विजयी झाले· "श्री भिमराव केराम यांनी जवळपास आठ हजार मताधिक्याने जिंकून महाराष्ट्राच्या राजकारणात उदयाला येत असलेल्या तिस-या शक्तीची जाणीव करून दिली·"[24]

नोव्हेंबर 1993 साली उत्तर प्रदेशामध्ये विधानसभा निवडणूका झाल्या. बाबरी मशिदीच्या प्रश्नांवर भाजपाने या निवडणूका लढविल्या. भा.ज.पा. चे आक्रमण रोखण्यासाठी समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष हे दोन पक्ष एकत्र आले. समाजातील गरीबांची ताकद या दोन पक्षांच्या पाठीमागे उभी राहिली. त्यामुळे त्या निवडणूकीत भाजपाचा पराभव करून स.पा.ब.स.पा. या दोन पक्षाची आघाडी सत्तेवर आली. कॉंग्रेसचा राजकीय पाया स.पा. आणि ब.स.पा.कडे सरकल्याने कॉंग्रेसचा मोठा पराभव झाला. या ~~दोन्ही~~ विजयामुळे बहुजन महासंघाच्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढले आणि महाराष्ट्रातही असा बदल घडवून आणता येईल असे त्यांचे मत आहे.

## भारिप-बहुजन महासंघाची राजकीय व्यूहनीती

भारतीय रिपब्लिकन पक्षाची 1984 ला स्थापना झाल्यानंतर पक्षाने प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली व्यापक भूमिका घेऊन आपली राजकीय व्यूहनीती आखली. फक्त एक जातीय राजकारण न करता तमाम दलित, श्रमिक व इतर मागासवर्गीय बहुजन समाजाच्या हितांच्या दृष्टीने राजकीय व्यूहनीती विकसित केली. दलितांची चळवळ ही भावनिक न ठेवता त्याच्या आर्थिक उन्नतीसाठी जमीनीचे राष्ट्रीयीकरण, मंडल आयोगाची रास्त अंमलबजावणी, लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व बहुजन दलित समाजाला सत्ता व प्रशासकीय हक्क प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

1984 नंतर उत्तरेकडे ब.स.पा.प्रभावी होत असताना ब.स.पा.च्या धर्तीवरच महाराष्ट्रात भारिपचे आ.मखराम पवार व नेते प्रकाश आंबेडकर यांनी सर्व बहुजन समाजाला बरोबर घेऊन सत्ता मिळविणेसाठी बहुजन महासंघाची स्थापना केली.

सध्याच्या राजकीय व्यवस्थेत राजकीय सत्ता मूठभर प्रस्थापित उच्चवर्णियांच्या हाती एकवटलेली आहे. या राजकीय वर्गाचा आधार त्यांची जात व आर्थिक संपन्नता हा आहे. सध्याचे राजकारण हे वर्ग, जात यांच्या परस्पर संबंधाचा शक्तीमान आविष्कार आहे. यामुळे निम्म्यापेक्षा संख्येने जास्त असणारा बहुजन मध्यम जाती, दलित, आदिवासी भटके-विमुक्त, अल्पसंख्याक समाजाची मोठया प्रमाणावर उपेक्षा होत आहे. सत्ता हे

समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याने भारिप-बहुजन महासंघास सर्वांगीण उन्नतीसाठी सत्ता हस्तगत करणे महत्त्वाचे वाटते. त्यादृष्टीने त्यांनी अकोला पॅटर्न हा प्रयोग केला. त्याच आधारे किनवटची पोटनिवडणूक जिंकली.

केवळ सत्ता संपादन करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट नसले तरी भारिप-बहुजन महासंघाने राजकारणाला तमाम बहुजन समाजाच्या हिताच्या दृष्टीने समाजकारणाची जी जोड दिली आहे ती महत्त्वाची आहे. एका बाजूला प्रस्थापित सत्ताधा-यांबरोबर संघर्षाचे राजकारण तर दुस-या बाजूला पुरोगामी परिवर्तनवादीसमाजकारण अशी भारिप-बहुजन व्यूहनीती आहे. 1990 मध्ये महासंघाच्या वतीने अकोला जिल्हाधिकारी कार्यालयावर मंडल आयोगाच्या समर्थनार्थ काढलेला मोर्चा हा पुरोगामी समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. भविष्यकाळात महाराष्ट्रात तिसरी शक्ती म्हणून भारिप-बहुजन महासंघ निश्चितपणे उभा राहील असे दिसते. मात्र दलित आणि बहुजनांचे राजकारण या सर्व बाबतीत यशस्वी होणे गरजेचे आहे भारिप-बहुजन महासंघाचे राजकारण कितपत यशस्वी होईल, याविषयी भारिप राज्य अध्यक्ष, अर्जुन डांगळे म्हणतात, "भारिप-बहुजन महासंघाचा सत्ता हस्तगत करण्याचा उद्देश आहे. परंतू सत्ता जरी मिळाली नाही तरी किमान राजकीय ताकद म्हणून उभे राहू इच्छितो. आम्ही सत्तेच्या दिशेने झेपावतोय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "सत्ता हे समाज परिवर्तनाचे हत्यार झाले पाहिजे" त्यासाठी आम्ही अनेक लढे उभे केले. समग्र व्यवस्था बदलण्यासाठी सत्ता मिळविणे गरजेचे वाटते. त्यासाठी भावी काळातील सत्तेच्या लढाईसाठी भारिप-बहुजन महासंघाचे राजकारण निश्चित यशस्वी होईल."[25]

महाराष्ट्रातील कॉंग्रेस व भाजपा, शिवसेना यांना शत्रू मानून भारिप-बहुजन महासंघाने समाजाला जागृत करण्याचे काम सुरू केले आहे.

भविष्यकाळात होणा-या निवडणूकीत इतर डाव्या पक्षांना बरोबर घेऊन राजकीय सत्ता संपादन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासाठी भारिप-बहुजन महासंघाने भारतीय कम्युनिस्ट पक्ष, डॉ.दत्ता सामंत कामगार आघाडी यांना घेऊन "बहुजन श्रमिक समिती" ची स्थापना केली आहे. भविष्यात भारिप-बहुजन महासंघाची ही राजकीय व्यूहनीती कितपत यशस्वी होते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. परंतू प्रकाश आंबेडकरांनी

भारिप-बहुजन महासंघाची जी नवी व्यूहनीती विकसित केली तिला डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचाच पाया असल्याचे दिसते· बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या काळात दलितांना इतर समविचारी पक्ष व लोकांच्या सहकार्याने सर्व शोषित, पिडीतांचे संघटन करून राजकीय सत्ता हस्तगत करावी असे सुचविले होते, या बाबासाहेबांच्या विचारानुसार प्रकाश आंबेडकर दलितांऐवजी सर्व बहुजन समाजावर भर देऊन राजकारण करताना दिसतात·

## बहुजन समाज पक्ष व भारिप बहुजन महासंघ

बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली· परंतू या पक्षाचे मजबूत संघटन होऊ शकले नाही· हा पक्ष गटागटात विभागला गेला· पण प्रकाश आंबेडकरांनी पुनर्बांधणी केला रिपब्लिकन पक्ष हा समाजातील इतर मागासांना घेऊन राजकारण करीत आहे· रिपब्लिकन पक्षा पेक्षा भारिप-बहुजन महासंघ व्यापक भूमिका घेऊन दलित मुक्तीचा विचार करीत आहे· दलित पँथरने 1972 नंतर वर्गीय आणि जातीय अशा दोन्ही पातळ्यांवर लढा दिला· परंतु पँथरलाही फूटीचे गालबोट लागले· भारतीय दलित पँथरच्या रूपाने 1976 नंतर महाराष्ट्रात तरूणांचे संघटन झाले· पँथरने संसद बाह्य राजकारण करून आक्रमकपणे वर्गीय व जातीय व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला· परंतू भारिप-बहुजन महासंघ संसदीय व्यवस्थेत राहून व संसदीय व्यवस्थेच्या बाहेरही राजकीय लढे देत आहे·

1984 नंतर देशात कांशीराम यांचे नवे दलित नेतृत्व उदयाला आले· त्यांच्या राजकारणाचा थोडा फार प्रभाव देशाच्या राजकारणावर पडताना दिसतो· कांशीराम यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाज पक्ष अलिकडच्या काळात उत्तर प्रदेशात सत्ता मिळवू शकला· परंतू भारिप-बहुजन महासंघ आणि बहुजन समाज पक्ष यांच्या वैचारिक भूमिकेत फरक आढळतो· कांशीराम यांच्या बहुजन समाज पक्षाचा प्रयत्न हा बनिया, ब्राह्मण, ठाकूर या वर्गाच्या शोषणापासून बहुजनांना मुक्त करण्याचा आहे· त्यांचे संघटन हे फक्त जातीय पायावरच आहे· तर भारिप-बहुजनं महासंघाचे संघटन हे जात आणि वर्ग या दोन्ही पातळ्यावर आहे· ब·स·पा·कडे सध्या कोणताच व्यवस्थित असा कृति कार्यक्रम नाही·

परंतु भारिप-बहुजन महासंघाकडे सर्व शोषित दलित बहुजनांना एकत्र करून त्यांची सर्वांगीण उन्नती कशी करता येईल, याचा कृति कार्यक्रम आहे. बहुजन समाज पक्षाची राजकीय चळवळ ही अत्यंत आक्रमक आणि दलितांची स्वतंत्र चळवळ चालावी असा मर्यादित उद्देश्य आहे पण भारिप-बहुजन महासंघाची राजकीय चळवळ ही दलितांनी पुढाकार घेऊन बहुजनांना संघटित करावे असा त्यांच्या चळवळीचा प्रयत्न आहे. बहुजन समाज पक्ष हा आपल्या वैचारिक बैठकीच्या संदर्भात आपण पूर्णपणे आंबेडकरवादी आहोत असे मानतात. परंतू भारिप-बहुजन महासंघ आंबेडकरवादी विचार परंपरेला तर मानतातच पण त्याचबरोबर वैदिक ब्राह्मणी संस्कृती वगळून सर्व शोषित, पिडीत व इतर मागासवर्गीय बहुजनांची परंपरा मानतात. बहुजन समाज पक्ष आक्रमकपणे भूमिका घेत असून जातीय संघर्षालाच खतपाणी घालताना दिसतो. भारिप-बहुजन महासंघाच्या राजकीय व्यूहनीतीत संघर्षाला महत्त्वाचे स्थान आहे पण ते अकारण संघर्ष मान्य करीत नाहीत. बहुजन समाज पक्ष समाजातील 85 टक्के बहुजनांना संघटित करू इच्छित असले तरी त्याचे राजकारण पाहता त्यांचेजवळ सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक वैचारिक बैठक नसल्याचे दिसते.

भविष्य काळात प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारिप-बहुजन महासंघ राजकीय सत्ता हस्तगत करू पाहात आहेत. दलितासह सर्व बहुजनांची ते "तिसरी शक्ती" म्हणून उभी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांच्या या नव्या राजकीय व्यूहनीतीला समाजातील 85 टक्के बहुजनांनी पाठिंबा दिला तरच ती यशस्वी होईल.

# संदर्भ


1. डांगळे अर्जुन : "सम्यक् समाज आंदोलन निर्मिती आणि वाटचाल", प्रबुध्द भारत, 14/4/1983
2. उपरोक्त
3. डांगळे अर्जुन - दलित विद्रोह, ग्रंथघर प्रकाशन, मुंबई 1991, पृ.84
4. डोळस अविनाश - 'Bharatiya Republican Party. Its Rise and Development', "महाराष्ट्रातील दलित चळवळी" या विषयावरील राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील सेमिनारमध्ये वाचलेला पेपर - 9-10-11 फेब्रुवारी 1989.
5. डांगळे अर्जुन : "रिपब्लिकन पक्षाची पुनर्बांधणी कशासाठी", दै.लोकसत्ता 17 मे 1984
6. भारतीय रिपब्लिकन पक्ष पुणे अधिवेशन 5 आणि 6 मे 1984 येथील ठरावाची प्रत : उपलब्ध पक्ष कार्यालय मुंबई येथून झाली.
7. डांगळे अर्जुन : दलित विद्रोह "मनोगत" ग्रंथघर प्रकाशन मुंबई 1991,पृ.1
8. डोळस अविनाश - 'Bharatiya Republican Party. Its Rise and Development'
9. दै.अजिंठा ‖औरंगाबाद‖ दि.29/10/88 अधिवेशन वृत्त, पृ.1
10. भारिप राष्ट्रीय अधिवेशन 1988, ठराव प्रत - उपलब्ध व्दारा निलम गो-हे - सरचिटणीस महाराष्ट्र मुंबई प्रदेश पक्ष कार्यालयातून उपलब्ध.
11. महिला परिषद नागपूर, ठराव प्रत - पक्ष रेकॉर्डवरुन
12. 1984 निवडणूक जाहीरनामा पक्ष रेकॉर्डवरुन
13. निवडणूकीची माहिती पक्ष रेकॉर्डवरुन
14. उपरोक्त
15. भिंगे सुभाष - "बहुजन महासंघ" - बहुजनांच्या आकांक्षेचे व्यासपीठ",त्रै.मा. विचार शलाका : कुंभार नागोराव ‖संपा‖ एप्रिल ते जून 1993, पृष्ठ 27.

16· दाते सुनिल, "बहुजन महासंघ : भूमिका, कार्यक्रम व अपेक्षा, त्रै·मा·विचार शलाका : कुंभार नागोराव §संपा·§ एप्रिल ते जून 1993, पृ·105

17· बहुजन महासंघ : सामाजिक सांस्कृतिक - राजकीय उठाव - पत्रिका, प्रकाशन-शांताराम पंदेरे, पृ·1/2

18· पवार मखराम : बहुजन महासंघ - कशासाठी कोणासाठी ?, बहुजन प्रकाशन क्र·1, पृ·20, 29 एप्रिल 1993·

19· बहुजन महासंघ "सामाजिक सांस्कृतिक - राजकीय उठाव" प्रकाशन - शांतराम पंदेरे, पृ·11 ते 13

20· उक्त पृ·3 व 4

21· उक्त पृ·3 व 4

22·. महेश भारतीय : "जातीय राजकारणात बहुजन महासंघाचा शह", लोकप्रभा साप्ताहिक 18 एप्रिल 1993, पृ·13

23 . पवार मखराम, बहुजन महासंघ कशासाठी कोणासाठी ? - बहुजन प्रकाशन क्र·1, 29 एप्रिल 1993 पृष्ठ 13-14-15·

24 . दाते सुनिल "बहुजन महासंघ : भूमिका, कार्यक्रम व अपेक्षा" त्रै·मा·विचारशलाका कुंभार नागोराव §संपा·§ एप्रिल ते जून 1993, पृ·105

25 . डांगळे अर्जुन - मुलाखत दि·7/11/1994